# सहकारी संस्थांचे २००८ - ०९ वर्ष चालू झाले

३१ मार्च २००७ अखेर महाराष्ट्र राज्यात महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व सहकारी संस्था नियम १९६१ अन्वये २ लाख ७४० विविध प्रकारच्या संस्था नोंदणीकृत झालेल्या आहेत. या सहकारी संस्थांमध्ये ४ कोटी ६९ लाख सभासद आहेत. या सहकारी संस्थांमध्ये १,१२,७१४ कोटी रूपयांच्या ठेवी आहेत. व कर्जे येणे बाकी रू. १,१२,४८१ कोटी आहेत.

वरील आकडेवारीवरून आपल्या लक्षात येईल की, महाराष्ट्र राज्यातील ज्यांचे वय १८ च्या पुढे आहे, अशा एकूण लोकसंख्येच्या ६० ते ६५ टक्के लोक विविध प्रकारच्या सहकारी संस्थांमध्ये भागधारक आहेत. म्हणजेच महाराष्ट्र राज्याचा एकंदरीत कारभार हा सहकाराच्या विस्तारीत पायावर भक्कमपणे उभा राहिलेला आहे. जागतिकीकरण व खुली अर्थव्यवस्था यांचे आव्हान सहकारी संस्थांनी समर्थपणे पेलल्याचा हा पुरावा आहे. कारण सहकारी संस्थांच्या संख्येत, ठेवीत, भाग रकमेत वाढ ही दिवसेंदिवस होत चाललेली आहे. आणि हे सहकाराचे खरे इंगीत महाराष्ट्र राज्यात सर्वांसाठी उत्साहवर्धक आहे.

राज्यातील पतसंस्थांच्या बाबतीत यापेक्षा वेगळी परिस्थिती नाही. एकूण २७ हजार पतसंस्थांपैकी ४५०ते ५०० पतसंस्था वगळता ही सर्वसामान्यांची चळवळ, सर्वसामान्यांच्या आर्थिक उत्थानासाठी दिवसेंदिवस वृध्दींगत होत असल्याचे चित्र समाजापुढे स्पष्ट होत आहे. यापूर्वी पतसंस्थांच्या झालेल्या थकबाकीच्या वसुलीचे काम सर्वसाधारणपणे प्रत्येक वर्षाच्या जानेवारी महिन्यापासून अग्रहक्काने होताना दिसत होते. परंतु आता केवळ ३ महिन्यात थकबाकीची वसुली करणे हे पुरेसे नाही. यासाठी एप्रिल २००८ पासूनच पतसंस्थांनी ३१ मार्च २००८ अखेर थकीत राहिलेल्या कर्जदारांची सुची समोर ठेवून त्यांच्या वसुलीसाठी कालबध्द, शिस्तबध्द व नियमानुसार, नियमितपणे वसुलीची यंत्रणा राबविण्याची आवश्यकता आहे. यासाठी या २००८ - ०९ या आर्थिक वर्षातील आमचा हा विचार, राज्यातील प्रत्येक पतसंस्थेसमोर जावा असा आमचा प्रयत्न राहणार आहे.

पतसंस्थांनी एप्रिल २००८ ह्या महिन्यातील संचालक मंडळाच्या सभेतच थकबाकीदारांच्या विषया संदर्भात विषय पत्रिकेवर स्वतंत्र विषय ठेवून, वसुलीसाठी करावयाची उपाययोजना व जबाबदारी, लागणारे मनुष्यबळ व त्यासाठी लागणाऱ्या व पूर्तता कराव्या लागणाऱ्या सुविधांचा कालबध्द कार्यक्रम आखून संबंधितांकडे जबाबदाऱ्या निश्चित करणे आवश्यक आहे.

थकबाकी वसुलीसाठी प्रथम सर्वांना (जामीनदारांवरही) त्यांच्या राहण्याच्या, कामाच्या / व्यवसायाच्या व मूळ गावच्या पत्यावर थकीत झालेल्या रकमेची प्रथम मागणी नोटीस अंडर सर्टिफिकेट पोस्टींगद्वारे पाठविली पाहिजे. पतसंस्थेतील कर्मचाऱ्यांनी हे दिलेले काम ३१ मार्च २००८ पर्यंत थकीत मुद्दल - व्याज - दंडव्याज - इतर येणे रकमांचे हिशोब करुन त्या नोटीसा वेळेत पाठविल्या आहेत किंवा नाही याची संचालक मंडळाने जबाबदारीने व आपल्या वैयक्तिक दैनिक कामकाजातून खास वेळ काढून माहिती करुन घेणे आवश्यक आहे. पाठविलेल्या नोटीसांपैकी ज्या नोटीसा कुठल्याही कारणास्तव परत पतसंस्थेच्या कार्यालयात येतील, त्या कर्जदार / जामिनदारांच्या संबंधित पत्यामध्ये बदल झाला असेल असे गृहीत धरून, त्यांच्या उपलब्ध पत्यावर प्रत्यक्ष कर्मचाऱ्यांनी भेट देणे आवश्यक आहे. भेटीनंतर त्या जागेत आणि / किंवा आजूबाजूला संबंधित कर्जदार / जामिनदाराचा नवीन पत्ता

मिळविणेसाठी पत्ता मिळेपर्यंत प्रयत्न करणे आवश्यक आहे. आणि अशा बदललेल्या पत्याची माहिती पतसंस्थेस प्राप्त झाल्यानंतर त्या बदललेल्या पत्यावर, पून्हा अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगद्वारे नोटीस पाठविली पाहिजे. जेणेकरून थकबाकीदार व त्यांचे जामिनदार यांना पतसंस्थेच्या थकबाकी वसुलीबाबत, वसुलीच्या कार्यप्रणालीबाबत पूर्णतः माहिती होईल. आणि **आता मार्च संपला, त्यामुळे पतसंस्था येणाऱ्या जानेवारीपर्यंत थकबाकी वसुलीसाठी पाठपुरावा करणार नाही. असे जे थकबाकीदारांना वाटते, तो गैरसमज या निमित्ताने दूर होणार आहे.**

थकबाकीदारांना वसुलीसाठी पाठविलेली प्रथम मागणी नोटीसचा कालावधी १५ दिवसांचा ठेवावा. या कालावधीत जर थकबाकी पूर्णतः वसुल झाली नाही तर, १६ व्या दिवशी पतसंस्थेने पुन्हा वरील पध्दतीनेच कर्जदार व जामिनदारांना प्रत्येकी ३ पत्यांवर अशा ९ ठिकाणी २री नोटीस पाठविण्याची कार्यप्रणाली जाणीवपुर्वक अवलंबली पाहिजे. आणि ह्याही कालावधीत पूर्णतः थकबाकी प्राप्त झाली नाही तर, नंतरच्या १६ व्या दिवशी संबंधित थकबाकीदार, कर्जदार व जामिनदार यांचे विरोधात कलम १०१ अंतर्गत दावा दाखल करून वसुली दाखला मिळण्यासाठी प्रकरण बनविण्याचे धोरण नियोजनपूर्वक आत्मसात करावे. अशा पध्दतीने १६ मे २००८ नंतर ते ३१ मे २००८ या कालावधीत वरील संबंधित थकबाकीदारांवर कलम १०१ अंतर्गत दावा दाखल झाला किंवा नाही याची शाहनिशा जुनच्या १ ल्या आठवड्यात संचालक मंडळाने तपासुन बघितली पाहिजे. एकदा १०१ अंतर्गत दावा दाखल केला तर कुठल्याही परिस्थितीत ३ महिन्यांच्या आत संबंधित उपनिबंधकाकडून कर्जदार / जामिनदारांच्या विरोधात संपूर्ण थकबाकी वसुलीचा दाखला मिळविणेसाठी प्रत्येक तारखेस पतसंस्थेतील जबाबदार कर्मचारी / अधिकारी / संचालक / पदाधिकारी यांच्यापैकी एकाने पाठपुरावा केला पाहिजे. कुठल्याही कारणास्तव मा. उपनिबंधिकांकडून १५ दिवसांपेक्षा कालावधिची पुढील तारीख मिळणार नाही, यासाठी जागृतपणे आपले म्हणणे निबंधकांच्या समोर सुनावणीच्यावेळी ठामपणे मांडून त्याची नोंद सुनावणीच्या प्रोसिडींगमध्ये होते की नाही हे सुध्दा जाणीवपूर्वक बघितले पाहिजे.

एकदा कर्ज थकबाकीचा वसुलीचा दाखला पतसंस्थेस मिळाला की, २४ तासांच्या आत कर्जदार व जामिनदार यांना या दाखल्याच्या वसुलीसाठी पाठवयाची १५ दिवसांची विशेष कर्ज वसुली व विक्री अधिकारी यांच्या मागणीचे नोटीस बजावण्याची प्रक्रिया नियमानुसार होणे आवश्यक आहे. विशेष कर्ज वसुली व विक्री अधिकाऱ्याने ह्या बजावयाच्या नोटीसा अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगद्वारेच विहित नमुन्यात पाठविल्यानंतर १५ दिवस थांबणे आवश्यक आहे. ह्याही कालावधीत प्राप्त झालेल्या वसुली दाखल्याच्या आधारे संबंधितांकडून वसुली आली नाही तर, १६ व्या दिवशी विशेष कर्ज वसुली व विक्री अधिकाऱ्याने संबंधित कर्जदार / जामिनदार यांच्या स्थावर - अस्थावर, पतसंस्थेकडे गहाणवट ठेवलेल्या व न ठेवलेल्या व भागीदारातील व वारसाहक्काने असलेल्या चल - अचल मालमत्तेची जप्ती करणेसाठी १५ दिवसांची नोटीस बजावली पाहिजे. ही नोटीस देखील अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगद्वारेच पाठविली पाहिजे. तद्नंतर याही कालावधीत रक्कम वसुल झाली नाही तर, जप्तीची नोटीस विशेष कर्ज वसुली व विक्री अधिकाऱ्याने संबंधितींवर विहित वेळेत व नियमानुसार दिली पाहिजे. कलम १५६ नुसार जे अधिकार विशेष कर्ज वसुली व विक्री अधिकाऱ्यांना प्राप्त झाले आहेत, हे न्यायाधिशांचे अधिकार असल्यामुळे, त्याच भुमिकेने विशेष कर्ज वसुली व विक्री अधिकाऱ्याने मिळालेल्या सर्व अधिकारांचा कायद्याप्रमाणे योग्य वापर करून संबंधितांच्या जप्तीचा कार्यक्रम जाहीर करायला पाहिजे. जप्ती / लिलावापूर्वी कर्जदार, थकबाकीदार व त्यांचे जामिनदार यांना नैसर्गिक न्याय पुर्णपणे दिला जाईल याची खात्री करणे मात्र आवश्यक आहे.

काही प्रसंगी विशेष कर्ज वसुली व विक्री अधिकाऱ्याने नजीकच्या पोलिस ठाण्यातून पोलिसांची कुमक कायदेशीर शुल्क भरुन सोबत कायदा, सुव्यवस्था व स्वसंरक्षणासाठी नेणे सुध्दा आवश्यक आहे. या सर्व गोष्टींसाठी कायदा सर्वश्रेष्ठ आहे.  आणि त्यासाठी कोणाचा शिक्का, ओळखीची गजर भासत नाही. किंबहुना **राजकीय हस्तक्षेप किंवा दरम्यानच्या काळात थकबाकीदारांसाठी त्यांच्या वकीलाचे पत्र किंवा नोटीस विशेष कर्ज वसुली व विक्री अधिकाऱ्याच्या कारवाईला थांबवु शकत नाही** हे प्रत्येक विशेष कर्ज वसुली व विक्री अधिकाऱ्याने प्रथम समजावून घेतले पाहिजे. जोपर्यंत दिलेल्या **वसुली दाखल्याच्या आदेशावर वरील न्यायालयाकडून स्थगिति आदेश मिळत नाही तोपर्यंत इतर कुठल्याही वकीलाच्या नोटीसीने, दुरध्वनीने किंवा कोणाच्या सांगण्यावरून ही  थकबाकी वसुलीची प्रकिया विशेष कर्ज वसुली व विक्री अधिकाऱ्याने कुठल्याही परिस्थितीत थांबवू नये.** अनुभवावरून  लक्षात येईल की, एप्रिल २००८ ते जुलै २००८ या कालावधीत पतसंस्थेचे जवळ - जवळ प्रत्येक थकीत कर्ज  पूर्णता वरील कामकाजाच्या पध्दतीमुळे काही अपवाद वगळता वसुल झालेले असेल, हे याही क्षणी आवर्जुन आपल्या लक्षात  आणुन देण्यात येत आहे.

वरील सर्व माहिती व थकबाकी वसुली करण्याची पध्दत ही महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व सहकारी संस्था नियम १९६१ ला अधिन राहुनच सांगितली असल्यामुळे, पतसंस्थेला थकीत रकमेची वसुली करण्यासाठी काहीही अडचण येणार नाही. **अर्धवट वसुलीची प्रक्रिया करुन सवडीने पुढची कारवाई करणे, या वसुलीच्या कामकाजाच्या पध्दतीमुळे थकबाकी रकमेची वसुली होत नाही.** हा आतापर्यंतचा अनुभव आहे. आणि या पलीकडे दरम्यानच्या काळात ज्या समस्या, अडथळे थकबाकी वसुलीसाठी येतील, त्यावर संचालक मंडळाने बैठक घेवून त्यातून कायद्याला अधीन राहुन मार्ग काढला पाहिजे. ज्या व्यक्तीने पतसंस्थेकडून कर्ज घेतले, कागदपत्रे दिली त्या व्यक्तीची, त्या कर्जाची व्याजासह परतफेड प्रति महिना होते किंवा नाही हे नियमितपणे न अभ्यासल्यामुळे थकबाकीदारांची संख्या व थकीत रकमेचा आकडा वाढत जातो व त्याचे  दुष्परिणाम पतसंस्थांना भोगावे लागतात.  आणि आपण स्वतः थकबाकी वसुलीसाठी याबाबत जाणीवपुर्वक बघत नाही. **अर्धवट व काम चलावू वसुलीसाठी काम करणे हेच मुळात थकबाकीदारांची संख्या व थकबाकी रक्कम वाढण्याचे मुळ कारण आहे** हे आपल्या लक्षात येईल.

सन २००८ - ०९ या सहकारी वर्षासाठी पतसंस्थांना वरील माहिती जाणीवपुर्वक आम्ही प्रसिध्द करीत आहोत. जरी पतसंस्थांना सर्व गोष्टी माहित असल्या तरी, वर उल्लेखलेली थकबाकी वसुलीची कार्यप्रणालीची तंतोतंत  अंमलबजावणी करण्यामुळे थकबाकी वसुली होणार आहे म्हणून, हे आर्थिक वर्षे प्रत्येक पतसंस्थेला वरील थकबाकी वसुल करण्याच्या कार्यपध्दतीच्या अनुकरणाने फलदायी ठरो, अशी अपेक्षा या निमीत्ताने आम्ही करतो व सुयश चिंतीतो.

जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!